कमला कॉलेज, कोल्हापूर ग्रंथालय

# सलग बाराव्या रविवारीही स्वच्छतेला प्रतिसाद

## पाच डंपर कचरा जमा; शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्थांचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १४ : शहरात आज सलग बाराव्या रविवारीही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सकाळी ७ वाजल्यापासून हे अभियान राबविण्यात आले. या अभियानात सेवाभावी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, शहाजी कॉलेज व कमला कॉलेजच्या एन.सी.सी. व एनएसएसचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिका व विविध संघटनांनी सहभाग नोंदवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी पाच डंपर कचरा गोळा केला.**



कोल्हापूर : शहरात सलग बाराव्या रविवारी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत सहभागी एनसीसीचे विद्यार्थी.

आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त मंगेश शिंदे, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, जलअभियंता सुरेश कुलकर्णी यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले.

सकाळी पंप हाऊस येथे स्वच्छतेची शपथ घेऊन आयुक्त डॉ. कलशेट्टी यांच्या हस्ते मोहिमेस प्रारंभ झाला. यावेळी शहाजी कॉलेजचे एन.सी.सी. व एन.एस.एस.च्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवून परिसराची व कॉलेज कॅम्पस परिसराची स्वच्छता करून वृक्षारोपण केले.

राजारामपुरी येथे कमला कॉलेजच्या एन.सी.सी. व एन.एस. एस.च्या विद्यार्थिनींनी राजारामपुरी परिसराची व कॉलेज परिसराची स्वच्छता करून वृक्षारोपण केले.

महापालिकेतर्फे विल्सन ब्रिज लक्ष्मीपुरी, सावित्रीबाई फुले हॉस्पिटल मागील बाजूस ते रिलायन्स मॉल पिछाडीस, सिद्धिविनायक गणपती मंदिर पुलाची खालची बाजू, लक्ष्मीपुरी ते आयर्विन ब्रिज, टायटन शोरूम लगत दफनभूमी, आयर्विन ब्रिज ते पंप हाऊस, पंप हाऊस ते सिध्दार्थनगर या जयंती नाल्याच्या परिसराची व रंकाळा तलाव पूर्व व पश्चिम बाजूची स्वच्छता करून वृक्षारोपण केले. यावेळी सलगर यांनी मोहिमेतील उपस्थितांना मोफत चहा दिला.

यावेळी सहायक आयुक्त संजय सरनाईक, प्राचार्य डॉ. सुरेश गवळी, उपशहर अभियंता हर्षजित घाटगे, नारायण भोसले, आर. के. पाटील, प्राचार्य आर. के. शानेदिवाण, प्र. प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर, अनिल घस्टे, डॉ. सुजय पाटील, प्रा. रेखा पंडित, वर्षा साठे, गिरीश जोशी, शिवानी जोशी, नितीन शिंदे, दिलीप देसाई, उदय गायकवाड, शहाजी कॉलेज एन.सी.सी., एन.एस. एस.चे १०० विद्यार्थी, विद्यार्थिनी, कमला कॉलेजच्या ६० विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिकांनी सहभाग घेतला.

### अधिकारी, कर्मचाऱ्यांचा उत्साह होऊ लागला कमी

स्वच्छता मोहिमेचा सलग बारावा रविवार होता; पण या मोहिमेत रविवारी सुटीचा दिवस असल्याने सहभागी व्हायला अनेक अधिकारी, कर्मचारी निरुत्साह दाखवत आहेत. मोहिमेत अधिकारी, कर्मचाऱ्यांची संख्या कमी होती. एका बाजूला आयुक्त कलशेट्टी विविध घटकांना सामावून घेत असताना दुसरीकडे अधिकारी, कर्मचारी मात्र त्यांची साथ सोडत आहेत.